स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २८ ऑक्टोबर, २०२२

जळगाव दि.२८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभागाच्यावतीने खान्देशकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी व्याख्यानमालेत अंधश्रध्दा निर्मूलन कायदा विशेषंकाचे संपादक रवींद्र पंढरीनाथ यांच्या व्याख्यानाचे आयोजन दि.३१ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे.

यावेळी विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या संचालक प्रा.मधुलिका सोनवणे हया अध्यक्षस्थानी असतील. हे व्याख्यान सोमवार दि.३१ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता झुम लिंक (Meeting ID 8192480930 Pass code 999429) व्दारे ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात आले आहे. युट्युब व फेसबुक वरुन सुध्दा हे व्याख्यान ऐकता येईल. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर या व्याख्यानाची लिंक उपलबध करुन देण्यात येणार आहे अशी माहिती विभागाचे संचालक प्रा.आशुतोष पाटील यांनी दिली.

## बातमी क्र. २

जळगाव दि.२८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारे उत्साही संवाद या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा संपन्न झाली.

दि.२१ ऑक्टोबर रोजी व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत झालेल्या या कार्यशाळेत महेश वागळे यांनी उत्साही संवाद कसा करावा, संवाद साधतांना आपले विचार, भावना, कल्पना एकमेकांसोबत कसे मांडावे आदी बाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रशाळेच्या संचालक प्रा.मधुलिका सोनवणे हया अध्यक्षस्थानी होत्या. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.रमेश सरदार यांनी केले. विद्यापीठाने वालचंद पीपल्स फर्स्ट लिमिटेड सोबत केलेल्या करारांतर्गत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत ९८ विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी